अति महत्वाचे

जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/२०२०/ 3262
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७,डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक:-03/१२/२०२०.

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य

विषय :- शासनमान्यता प्राप्त वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन (GCC) आणि संगणक टंकलेखन (GCC-TBC) संस्थांच्या नुतनीकरणाबाबत.
संदर्भ :- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे जा.क्र.३११६, दि.२४/११/२०२० चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये शासकीय वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन परीक्षा आणि शासकीय संगणक टायपिंग परीक्षा जुलै-२०२० ते डिसेंबर-२०२० या सत्रासाठीची परीक्षा माहे फेब्रुवारी-२०२१ मध्ये घेण्यात येत आहे.

सदर परीक्षांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही ०१ डिसेंबर - २०२० पासून सुरु करण्यात आलेली आहे. सदर परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्र भरत असताना त्यासोबत संस्था नुतनीकरण आदेश अपलोड करणे आवश्यक आहे.

तथापि ज्या संस्थांना नुतनीकरण आदेश प्राप्त झाले आहेत, अशा संस्थांनी संस्था नुतनीकरण आदेश अपलोड करावेत. तसेच ज्या संस्थांना अद्यापपर्यंत नुतनीकरण आदेश प्राप्त नाहीत किंवा ज्या संस्थांनी नुतनीकरण प्रस्ताव आपल्या संबंधित शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे अद्यापपर्यंत सादर केलेले नाहीत, अशा संस्थांनी सदरच्या परीक्षेसाठी आवेदनपत्र भरताना पुढील कार्यवाही करावी.

१. ज्या संस्थांना नुतनीकरण आदेश प्राप्त झालेले आहेत अशा संस्थांनी फेब्रुवारी-२०२१ मधील परीक्षांसाठी नुतनीकरण आदेश अपलोड करावेत.

२. ज्या संस्थांनी अद्यापपर्यंत नुतनीकरण करुन घेतलेले नाही. अशा संस्थांनी त्वरीत नुतनीकरणाबाबतचे प्रस्ताव आपल्या संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) या कार्यालयांकडे सादर करावेत. त्याचप्रमाणे संबंधित कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रस्तावांचा अग्रेषित पत्राची प्रत (कव्हरिंग लेटर) व त्या सोबत मागील लगतच्या वर्षाची नुतनीकरण आदेशाची प्रत सदर फेब्रुवारी-२०२१ मधील परीक्षेची आवेदनपत्र भरताना अपलोड करावी.

३. ज्या संस्थांचे नुतनीकरणाचे प्रस्ताव संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) व विभागीय शिक्षण उपसंचालक या कार्यालयांकडे प्रलंबित आहेत, अशा संस्थांनी संबंधित कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रस्तावांचा अग्रेषित पत्राची प्रत (कव्हरिंग लेटर) व त्या सोबत मागील लगतच्या वर्षाची नुतनीकरण आदेशाची प्रत सदर फेब्रुवारी-२०२१ मधील परीक्षेची आवेदनपत्र भरताना अपलोड करावी.

त्या अनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेची नुतनीकरणाबाबतची कार्यवाही विभागीय शिक्षण उपसंचालक या कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल करुन दि.३० नोव्हेंबर २०२० पर्यंत करुन घ्यावी, असे आपणास सुचित करण्यात आले होते.

या पत्रान्वये आपणांस संस्था नुतनीकरणाबाबतची कार्यवाही करणेकरीता दिनांक ३१ जानेवारी २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

(तुकाराम सुपे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
३) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प)